# शिवाजी महाराजांचे परराष्ट्र धोरण : विशेष संदर्भ पोर्तुगीज

**कल्पना गोविंदराव बडे** संशोधक विदयार्थी, इतिहास विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मो. नं. ९३२५७१३६५० Email: badekalpana93@gmail.com

---

**सारांश :** भारतात १६ व्या शतकात व्यापारासाठी पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज या परकीय सत्तांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या. यापैकी पोर्तुगीजांनी भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावर गोवा, कोचीन, चौल, मुंबई, साष्टी, दमण व दीव येथे आपल्या वखारी स्थापन केल्या. स्वराज्यालागत असणाऱ्या या युरोपीय सत्तेशी शिवाजी महाराजांचे संबंध येणे अपरिहार्य होते. मराठा पोर्तुगीज संबंधाची सुरूवात शिवाजी महाराजांपासून झाली ही जरी खरे असले तरी शिवाजी महाराजांचे वडील शहाजी ही निजामशाही चाकरीत होते. तेव्हा त्यांचा आणि पोर्तुगीजांचा संबंध आला होता. शहाजी राजे आदिलशाहीत गेल्यावर हा संबंध दृढ झाला. गोव्याचा बरोबर शहाजी राजे यांचा पत्रव्यवहार होता परंतु तो केवळ औपचारिक स्वरूपाचा होता. मराठे आणि पोर्तुगीज यांच्या मध्ये राजकीय पातळीवर संबंध शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यावर निर्माण झाला. शिवाजी महाराजांनी उत्तर कोकणवर इ. स. १६५८ साली स्वारी केली तेव्हा पोर्तुगीजांशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला.

शिवाजी महाराजांचा आपले परराष्ट्रीय धोरण ठरवताना पोर्तुगीज या परकीय सत्तेशी त्यांचा संबंध आला. या पोर्तुगीजांशी शिवाजी महाराजांचे संबंध कसे होते तसेच त्यांच्याबाबत शिवाजी महाराजांचे धोरण कसे होते याचा आढावा प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये घेण्यात आला आहे.

**उद्दिष्टे** :

१) शिवाजी परराष्ट्र नीतीचा अभ्यास करणे. २) शिवाजी महाराज व पोर्तुगीज संबंधाचा आढावा घेणे.

**प्रस्तावना :** सिद्दीनंतर हिंदुस्थानात येणारे परकीय लोक म्हणजे पोर्तुगीज. त्यांनी इ.स.१४९८ मध्ये हिंदूस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर प्रथम पाऊल ठेवले. शिवाजी महाराजांनी इ.स.१६४८ मध्ये कल्याण प्रांत काबीज केला, तेव्हा मराठयांचा वसई व ठाणे येथील पोर्तुगीजांशी संबंध आला. इ.स. १६५७ च्या सुमारास शिवाजाीने वरच्या चौलचा ताबा घेतला, तेव्हा खालच्या चौलमधील पोर्तुगीजांशीही मराठयांचा संबंध आला. इ.स. १६५९ मध्ये शिवाजीने मराठयांच्या आरमाराची मुहूर्तमेढ रोवली. शिवाजीच्या गलबतांपासून पोर्तुगीजांना धोका उत्पन्न होणार हे पाहून, त्यांनी त्यात शक्य त्या अडचणी उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. शिवाजीच्या आरमारामध्ये लहान व जलद धावणारी तारवे होती. त्यामुळे पोर्तुगीजांच्या मोठया तारवांपासून त्यांचे सहज संरक्षण होत असे. आपले आरमार तयार झाल्यावर शिवाजीने पश्चिम किनाऱ्यावर आपला दरारा बसविला.

**शिवाजी महाराज व पोर्तुगीज संबंध**

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा आरंभ केल्यानंतर त्यांना आपले आरमार असावे असे वाटू लागले. त्यासाठी महाराजांनी चेऊल व वसईच्या आसमंतातील भिवंडी, कल्याण, पनवेल हा मुलूख काबीज केला, या जागातील जंगलातून जहाजे बांधण्याजोगे लाकूड घेऊन आरमारी जहाजे बांधिली. चौलच्या अधिकाऱ्याने शिवाजी महाराजांनी बांधलेल्या जहाजाबद्दलची माहिती १६५९ च्या पत्राने पोर्तुगालच्या राजास कळविली. या अगोदर एक वर्ष शिवाजी महाराजांनी इ.स.१६५८ साली उत्तर कोकणवर स्वारी केली. तेव्हा पोर्तुगीजांच्या चौल आणि दमण ठाण्यांना मराठा सैनिकांकडून उपसर्ग पोहचला.[१] पुनहा शिवाजी राजांनी १६६१ साली दक्षिण कोकणवर स्वारी केली. त्यावेळी त्यांचे सैन्य गोव्याच्या हद्दीपर्यंत आले. शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाचा पराभव केल्यानंतर त्यांचे अभिनंदन पोर्तुगीजांनी दिनांक २७ एप्रिल १६६३ च्या पत्राने केले. यावेळपर्यंत शिवाजी महाराजांनी विजापूरकरांचे डिचोली आणि साखळी हे दोन प्रांत जिंकून घेतले. तेव्हा पोर्तुगीजांनी आपला वकील रामजी शेणवी यास अभिनंदनपर पत्र देऊन राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी शिवाजी महाराजांकडे पाठविले.

इ.स.१६६४ च्या ऑगस्ट मध्ये चेऊलच्या पोर्तुगीज कॅप्टनने शिवाजी महाराज चेऊलच्या वर भागात ५० जहाजे बांधीत आहे. त्यापैकी त्यांची ७ जहाजे समुद्रावर फिरण्यास तयार झाली आहेत असे पोर्तुगालला कळविले.[२] या आरमारी तयारीचा रोख पोर्तुगीजांवर असावा असा संशय डच व फ्रेंच घेत होते. तरी या आरमाराचा पहिला आघात कोठे व कसा होणार याची थोडीशीही कल्पना या युरोपीन दर्यावर्दीना शिवाजी महाराजांनी येऊ दिली नव्हती.

शिवाजी महाराज व मोगल यांचे वितुष्ट आल्याचे दिसताच गोव्याच्या पोर्तुगीजांनी जयसिंगालला पत्र लिहिले की, "आपल्याला खर्च दिल्यास आपण शिवाजीचे आरमार बुडविण्यास मोगलांना मदत करु मात्र युध्दाचा खर्च मोगलांनी करावा." याचवेळी जयसिंगाकडून गोव्याच्या व्हाईसरॉयने महाराजांना लिहिले, "आपण आग्ग्याहून सुटून आलात याचा आनंद वाटतो."[३] पोर्तुगीज गोवा सरहद्दीवर देत असलेला त्रास राजांना माहित होता. त्यांचा बंदोबस्त करण्याची संधी त्यांना चालून आली. विजापूरकर पक्षाचे लखम सावंत, केशव नाईक, केशव प्रभू, आदी कोकणातील देसाई गोव्यात आश्रय घेऊन महाराजांच्या मुलूखात उपद्रव करीत. पोर्तुगीज त्यांना आतून मदत करीत म्हणून इ.स.1667 नोव्हेंबर १९ ते २० तारखेच्या रात्री राजियांचे सुमारे ५ हजार पायदळ व १ हजार घोडदळ पोर्तुगीजांवर चाल करुन गेले. त्यांनी बारदेशात प्रवेश केला.[४] आणि तीन दिवसात १६ खेडी बेचिराख केली व 1300 कैदी धरुन नेले व दीड कोट पागोडा नेल्या. तेव्हा पोर्तुगीजांचे डोळे उघडले त्यांनी पकडून नेलेले कैदी सोडविण्यासाठी व तहाचे बोलणे करण्यासाठी पाद्री गालेसालू मार्तीस व रामजी शेणवी कोठारी यांना राजियांकडे पाठविले. यावेळी शिवाजी महाराज बिचोलीमला

गोव्याजवळ होते.[५] राजांनी आपला वकील सखोपंत यास गोव्यास पाठविले. त्याचे व पोर्तगीजांचे बोलणे होऊन पोर्तुगीज वकील गोझांलो मार्टिन यास बरोबर घेऊन तो रायगडास गेला. तेथे ११ डिसेंबर १६६७ मध्ये त्यांच्यात तह झाला.

**शिवाजी महाराज व पोर्तुगीज तह**

१) यापूर्वी गोव्यातून पकडून नेलेले कैदी व गुरे-ढोरे मराठयांनी सोडून द्यावी.

२) लखम सावंत, केशव नाईक, देसाई हे शिवरायांचे पुरातन शत्रू गोव्यात राहून मराठयांच्या मुलखास उपद्रव देतात. त्यांस पोर्तुगीजांनी गोव्यातून हाकलून द्यावे.

३) बाळेघाटातून बैलांच्या पाठीवरुन जो माल येईल त्यास तोशीस न लावता आदिलशाही दरापेक्षा जास्त दंडक लावू नये.[६] अशा प्रकारचा तह मराठे व पोर्तुगीज यांच्यात झाला.

पोर्तुगीजांवर स्वारी करण्याचा शिवाजी राजांचा दुहेरी हेतू होता. एक म्हणजे बंडखोर देसाई शिवाजीच्या मुलखात घुसखोरी करुन लूटालूट करतात. त्यास पोर्तुगीजांनी आश्रय देऊ नये. दुसरा हेतू असा की, पोर्तुगीज प्रदेशातील हिंदूंचे बळजबरीने होत असलेल धर्मांतर थांबवावे. धर्मांतराचा उल्लेख पोर्तुगीज कागदपत्रात सापडत नाही असे स.शं. देसाई म्हणतात. पण इंग्रजी पत्रात "जेव्हा मुलाचा बाप मरतो, तेव्हा त्यांना जेसुइट कॉलेजात नेण्यात येते. तेथून त्याला त्यांच्या नातेवाईकांच्या हवाली कधीच केले जात नाही" असे आढळते.[७] शिवाजी राजे यांनी बारदेशवर स्वारी केली व पाद्रयांना पकडले. त्यांना हिंदू होण्यास सांगितले. त्यांनी नकार दिल्यावर त्यांची कत्तल केली. व्हाईसरॉयने याची भयंकर दहशत घेतली व धर्मांतराचे कडक आज्ञापत्र त्याने मागे घेतले. शिवाजी राजांनी सर्वत्र जाळपोळ केली व दीड कोट पगोडा म्हणून पोर्तुगीजांनी शिवाजी राजांना देऊन वरील सलोख्याचा तह केला. तसेच पोर्तुगीज व्हाईसरॉयने १६ फेब्रुवारी १६६८ च्या पत्राने लखम सावंत व केशव नाईकास राज्यातून जाण्याची आज्ञा दिली.[८] नंतर २८ मे ला सर्व देसायांना पोर्तुगीज सत्ता घालवून देण्यासाठीच बारदेशवर स्वारी केली होती.

शिवाजी महाराजांच्या शक्तीबद्दल व्हाईसरॉय पोर्तुगालच्या राजास पत्राने कळवितो की, "शिवाजी मोठा प्रबळ राजा असून, सामर्थ्यवान अशा अनेक प्रबळ शत्रूंना न जुमानता जरा जपून वागतो. त्याची प्रजा त्याच्यासारखीच मूर्तिपूजक असली तरी तो सर्व धर्मांना नांदू देतो. या भागातील अत्यंत धोरणी व राजकारणी पुरुष म्हणून त्याची ख्याती आहे." इ.स. १६७० च्या अखेरीस पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजांशी आगळीक करण्यास सुरुवात केली. शिवाजी महाराजांची १३ गलबते एक १२००० किमतीचे मोठे जहाज सुरतेला जात असता ती पोर्तुगीजांनी वसईजवळ पकडले. या दोघांत चकमकी उडाल्या. मराठयांनी आपले आरमार दाभोळकडे नेले. शिवाजी महाराजांचे मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे यांच्या सैन्याने पोर्तुगीजांच्या मुलखात उपद्रव दिला. त्याने पोर्तुगीजांकडे चौथची मागणी केली. इ.स. १६७४- ७५ मध्ये मराठयांचा पोर्तुगीजांशी लढा चालूच होता. मराठी सैन्य १६७५ मध्ये फोंडा किल्ल्यास वेढा घालून बसले होते. किल्ल्यात पोर्तुगीजांची माणसे होती. त्यांना अन्नसामग्री गोव्याहून पोचत होती. अशी अन्नधान्ये भरलेली १० शिबारे शिवाजी महाराजांच्या सैनिकांनी पकडली. याबद्दल व्हाईसरॉयला विचारल्यावर तो नाकबूल झाला. यानंतर पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजांशी मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न आपला वकील पितांबर शेणवी यास महाराजांकडे पाठवून केला. महाराजांनी पोर्तुगीजांना लिहिले की वसई व दमणकडील मुलूख आता आमच्या ताब्यात आल्यामुळे तेथील चोथिया राजाला पोर्तुगीज अमलदारांकडून जो चौथ पूर्वी देण्यात येत होता तो चौथ आता आम्हांस द्यावा.[९] हे पोर्तुगीजांनी कालांतराने मान्य केले. शिवाजी महाराजांनी खंदेरी बेटाच्या तटबदीचे काम हाती घेतले होते. तेव्हा पोर्तुगीजांनी आपल्या राजाला दिनांक १५ नोव्हेंबर १६७९ च्या पत्राने कळविले की, येथील बांधकामास सिद्दी व इंग्रज यांनी विरोध करण्याचे ठरविले आहे. आमचे असे मत आहे की इंग्रजांपेक्षा शिवाजीचा शेजार बरा. या पत्रात पोर्तुगीज गव्हर्नरने पोर्तुगीज राजास लिहिताना महाराजांची तुलना सेनानायक ॲटिला याच्याशी केलेली असून ते बचावाचे व चढाईचे दोन्हीही युध्दे कुशलतेने खेळतात असे म्हटले आहे. यावेळी शिवाजीचे कोकणातील राज्य गोव्याचा लहानसा टापू सोडल्यास उत्तरेस रामपूरपासून दक्षिणेस कारवार जिल्हयातील गंगावळी नदीपर्यंत पसरले होते.

**निष्कर्ष :**१) शिवाजी महाराजांनी पोर्तुगीज सत्तेबरोबर सहकार्य, मैत्री, कूटनीती, मुत्सद्देगिरी या आधारावर संबंध प्रस्थापित झाले.

२) शिवाजी महाराजांनी पोर्तुगीज सत्तेबरोबर सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून स्वराज्याची पाळेमुळे मजबूत करण्याचे काम केले.

३) पोर्तुगीजांशी सामना करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार व सागरी तटबंदी निर्माण केली होती.

**संदर्भ :** १) पिसुर्लेकर पांडुरंग, पोर्तुगीज - मराठा संबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६७, पृ.१७८.

२) बेंद्रे शिवाजी, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र (पूर्वार्ध व उत्तरार्ध) साहित्य सहकार मुद्रणालय, अलिबाग, १९७२,पृ. ४३७.

३) Parvate T.V., Portuguese Maratha Relations, Secretary Maharashtra State board for Literature and culture ministry, Bombay, 1983, p.p.46

४) केळकर व आपटे (संपा) इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी भाग २, शिवचरित्र कार्यालय पुणे, १९३१, पृ.२०२.

५) Balkrishna, Shivaji the Great, D.B. Tarapurwala Sons & co., Bombay, 1938, p.p.574.

६) पिसुर्लेकर पांडुरंग, पोर्तुगीज मराठा संबंध, उपरोक्त पृ. ६१,६३,६५.

७) केळकर व आपटे, उपरोक्त पृ.२०२

८) पिसुर्लेकर पांडुरंग, उपरोक्त पृ.२५

९) Sen S.N., Historical Records at Goa, Caulcutta University press, 1925, p.p.14